# प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग पुणे यांनी दिनांक २५/०८/२०१६ रोजी यशदा पुणे येथे, "पूल सर्वेक्षेणा संदर्भातील प्रशिक्षण व चर्चासत्र" या विषयावर सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंतच्या सर्व अधिका-यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.

या सत्राचे उद्‌घाटन मा. श्री चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, महसुल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांनी केले. या एक दिवसाचा चर्चासत्र मध्ये मा. श्री चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, महसुल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव, सचिव (इमारती) व सचिव (रस्ते) यांनी मार्गदर्शन केले.

त्याच प्रमाणे या चर्चासत्र मध्ये पूल सर्वेक्षण, बांधकाम व देखभाल या क्षेत्रातील नामवंत तज्ञांनी सादरीकरणाच्या माध्यमातून अतिशय उपयुक्त मार्गदर्शन केले.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व प्रादेशिक विभागांनी त्यांचे कार्यकक्षतील सर्व पूला संदर्भातील माहिती सादरीकरणाच्या माध्यमातुन प्रस्तुत केली.